## नियमित दिवाणी दावा क.३६/२०१४ मधील नि.८७ खालील आदेश

प्रतिवादी नं.२ यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ नुसार दाखल करुन त्यांनी दाखल केलेल्या कैफियत निशाणी ८७ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

२. कैफियतीमध्ये हस्तदोषामुळे काही चुका झाल्या आहेत. जसे दुरुस्ती शब्दप्रयोग ' त्याला असले पॅट्रीया पोटेस्टा या अधिकार' दावा कलम "१ब च्या ऐवजी १क," दावा मान्य व कबुल असल्याबाबत 'वैकल्पीक' हा शब्द कमी करण्यास 'वादी प्रतिवादी यांच्यासाठी' इत्यादी शब्दप्रयोग दुरुस्तीने दाखल करण्याची परवानगी दयावी अशी मागणी प्रतिवादीने केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने हरकत घेवून दुरुस्ती मजकूर त्यास मान्य व कबुल नाही. शिवाय प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास खर्चाची आकारणी करावी अशी मागणी वादीने केली आहे.

४. प्रतिवादीच्या अर्जातील कथन व वादीच्या म्हणण्यामधील कथन यावरुन प्रस्तुत अर्जाच्या निकालार्थ खालील मुददे काढण्यात आले आहे व त्या मुददयांचा निष्कर्ष खालील कारणांवरुन मुदयांसमोरील निष्कर्षाप्रमाणे निर्णय देण्यात आला आहे.

| अ.क | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दावा दुरुस्तीचा मजकूर दाव्यातील वादाचा मुददा अंतिमरित्या निकालात काढण्यासाठी आवश्यक आहे असे प्रतिवादीने सिध्द केले आहे काय? | होकारार्थी |
| २ | दावा दुरुस्ती मजकुरामुळे वादीवर अन्याय होणार आहे काय? | नकारार्थी |
| ३ | आदेश कोणते? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्‌दा क्रमांक १ ते ३ करिता:</u>**

५ दुरुस्ती शब्दप्रयोगाचा मजकूर हा केवळ हस्तदोषाने झाला आहे असे प्रतिवादी सांगतो. शिवाय प्रस्तुत दाव्यास अदयाप निशाणी ५ तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दोन्ही बाजुच्या युक्तीवादाकरीता प्रलंबित आहे. म्हणजेच प्रस्तुत दाव्याची सदयस्थिती ही प्राथमिक अवस्थेत आहे. दुरुस्ती शब्दप्रयोगामुळे वादीच्या दाव्यावर कोणताही परिणाम होवू शकत नाही. त्यामुळे वादीवर अन्याय होण्याचा प्रश्न उदभवत नाही. दाव्यातील वादमुददे अंतिमरित्या निकालात काढण्याकरीता दुरुस्ती शब्दप्रयोग मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

६ *दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ बाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी उषा बाळासाहेब स्वामी आणि इतर वि. किरण आप्पासो स्वामी आणि इतर, (२००७ (५) एमएच.एल.जे) या न्यायनिर्णयात असे म्हटले आहे की, आदेश ६ नियम १७ च्या दुरुस्ती मंजुर करताना न्यायालयाने उदार भूमिका घ्यावी तसेच केलेल्या दुरुस्तीमुळे प्रतिपक्षाचे भरुन न येणारे नुकसान होणारे नसावे (परिच्छेद १८).*

७ *दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ बाबत मा.उच्च न्यायालयाच्या कृष्णाजी शंकर मोघे वि. सिताराम गंगाधर शिंदे २००३(१) एमएच. एल.जे या न्यायनिर्णयामध्ये 'दावा दाखल केल्यानंतर घडलेल्या पुढील गोष्टी याचा अंतर्भाव दाव्यात दुरुस्तीव्दारे दाखल करण्यासाठी आणि त्या घटना दावा मिळकतीच्या संदर्भात असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करावा, असे नमूद केले आहे.*

८ सबब मुददा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी काढत आहे. तसेच मुददा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी काढत आहे आणि मुददा क्र. ३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करण्यात आला आहे.

( खुल्या न्यायालयात आदेश देवून जाहीर करण्यात आला.)

sdxx
**(वि.र.दासरी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.**

कडेगांव.
ता.०९.०७.२०१४.